महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ ३१ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १२५ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## होऊ दे खर्च !

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत उमेदवारांच्या खर्चाची मर्यादा वाढली !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसाठी असलेली खर्चाची मर्यादादीडपटीने वाढविण्यात आली आहे. जिल्हा परिषदेसाठी सहा लाख तर महापालिकेसाठी १० लाखांची असलेली खर्च मर्यादा वाढविण्याची मागणी होत असल्याने राज्य निवडणूक आयोगाने ही मर्यादा वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार जिल्हा परिषदेसाठी असलेली खर्च मर्यादा नऊ लाखांपर्यंत तर मुंबई महापालिकेसाठी खर्च मर्यादा १५ लाखांपर्यंत वाढविण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी २०१७ साली उमेदवारांना खर्च मर्यादा निश्चित करण्यात आली होती. त्यावेळी मुंबई महापालिका आणि १५१ ते १७५ सदस्य संख्या असलेल्या महापालिकेसाठी उमेदवाराला १० लाख रुपये, ११६ ते १६० सदस्य संख्या असलेल्या महापालिकेत आठ लाख रुपये, ८६ ते ११५ सदस्य संख्या असलेल्या महापालिकेत ७ लाख रुपये इतकी खर्च मर्यादा निश्चित करण्यात आली होती. मात्र इतक्या पैशात निवडणूक खर्च भागविणे कठीण असल्याने ही मर्यादा वाढविण्यात यावी अशी मागणी पक्ष तसेच उमेदवारांकडून करण्यात येत होती. याची दखल घेत तब्बल आठ वर्षांनी या खर्च मर्यादेत दीडपटीने वाढ करण्यात आली आहे. महापालिकांसाठी सदस्य संख्या निहाय असलेली खर्च मर्यादा आता महापालिका वर्ग निहाय वाढविण्यात आली आहे. याबाबतचा आदेश राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी जारी केला.




राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशात बृहन्मुंबई महापालिका आणि ‘अ’ वर्गामध्ये येणाऱ्या पुणे व नागपूर महापालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना निवडणूक खर्चाची मर्यादा १५ लाख रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आली आहे.

तर ‘ब’ वर्गामध्ये येणाऱ्या पिंपरी चिंचवड, नाशिक व ठाणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना निवडणूक खर्चाची मर्यादा १३ लाख रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. याशिवाय ‘क’ वर्गामध्ये येणाऱ्या कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर व वसई-विरार महापालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना निवडणूक खर्चाची मर्यादा ११ लाख रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आली.

‘ड’ वर्गामध्ये येणाऱ्या उर्वरित १९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना निवडणूक खर्चाची मर्यादा ९ लाख रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब वेळोवेळी सादर करणे बंधनकारक राहील, असेही राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# भिवंडीतील शेतकऱ्यांना बुलेट ट्रेनच्या धर्तीवर मोबदला !

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी (प्रतिनिधी)** पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संकल्पनेतील ड्रीम प्रोजेक्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बहुचर्चित बुलेट ट्रेन कामाला गती मिळत असुन बुलेट ट्रेन रेल्वेसाठी संपादीत केलेल्या जमिनीप्रमाणेच विरार-अलिबाग कॉरिडॉरसाठी संपादीत करण्यात आलेल्या भिवंडी तालुक्यातील १४ गावांमधील जमिनीचा शेतकऱ्यांना मोबदला देण्यासाठी प्रस्ताव तयार करावेत असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच विरार-अलिबाग कॉरिडॉरमध्ये भूदान समितीची नोंद असलेल्या जमिनीच्या



कूळ शेतकऱ्यांना ९० टक्के मोबदला देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिली भिवंडी तालुक्यातील शेतकऱ्यांना समाधानकारक मोबदला न्याय मिळवून देण्यासाठी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्याकडून सातत्याने महसूलमंत्री कडे पाठपुरावा करण्यात येत होता. विरार-अलिबाग कॉरिडॉरमध्ये भूदान समितीच्या संपादीत जमिनी आणि जमिनीच्या गुणांक घटकांसंदर्भात निर्णय घेण्यासाठी महसूल मंत्री बावनकुळे यांनी बुधवारी मंत्रालयात विशेष बैठक घेतली. या बैठकीला जिल्हा परिषदेचे माजी सदस्य देवेश पाटील, सुधाकर म्हात्रे, सरपंच वैजयंती नामदेव पाटील, मयुर पाटील, संजय म्हात्रे, प्रदीप म्हात्रे यांच्यासह बहुतांश शेतकऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी 'व्हिडिओ कॉन्फरन्स'च्या माध्यमातून ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ हे सुद्धा चर्चेत सहभागी झाले होते. शेतकऱ्यांना ९० टक्के मोबदला विरार-अलिबाग कॉरिडॉरसाठी संपादीत करण्यात आलेल्या भिवंडी तालुक्यातील अंजुर, दिवेअंजुर आणि आलिमघर येथील काही सर्व्हे क्रमांकावर भूदान समितीच्या नावे नोंद होती.

मात्र, ती जमीन वर्षानुवर्षे शेतकऱ्यांच्या ताब्यात होती. भूदान कायद्याप्रमाणे प्रदान केलेल्या जमिनीसाठी राज्य सरकारला ४० टक्के व जमीनधारक शेतकऱ्यांना ६० टक्के लाभ मिळणार होता. त्याला शेतकऱ्यांचा विरोध होता. संबंधित शेतकऱ्यांना ९० % व राज्य सरकारला १० % मोबदला देण्याची मागणी होती. या मागणीसंदर्भात मुख्यमंत्री फडणवीसांनाही निवेदन देण्यात आले होते.

## लक्षवेधी

# सह जिल्हा निबंधक कार्यालयात लाचखोरी

### वरिष्ठ लिपिकासह एकाला अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे येथील सह जिल्हा निबंधक वर्ग १ कार्यालयातील वरिष्ठ लिपिकाने खासगी इसमामार्फत ७० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी सापळा रचत त्या दोघांना रंगेहात पकडले. तक्रारदार यांच्या आईने सन १९८७मध्ये भाईंदर पश्चिम येथील शांती विहार नगर परिसरात असलेल्या जयलक्ष्मी को-ऑप. हौसिंग सोसायटीमधील गाळा क्रमांक ११ खरेदी केला होता. शासनाच्या अभय योजना २००८ अंतर्गत त्या मालमत्तेचे नियमितीकरण करण्यासाठी मुळ खरेदीखत सह निबंधक कार्यालयात सन २००९ मध्ये जमा करण्यात आले होते.

अलीकडे तक्रारदार यांनी ते खरेदीखत परत मिळवण्यासाठी ठाणे येथील सह निबंधक वर्ग १ कार्यालयात संपर्क साधला असता, संबंधित वरिष्ठ लिपिक दिपक इसळ यांच्यामार्फत खासगी इसम अजित कोकमकर यांनी ७० हजार रुपये लाच मागितल्याचे उघड झाले. लाच मागणीची लेखी तक्रार तक्रारदार यांनी २८ ऑक्टोबर रोजी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली होती. त्यानुसार, पडताळणीदरम्यान इसळ व कोकमकर यांनी ७० हजारांवरून ६५ हजार रुपयांत तडजोड करून दोन टप्प्यांत रक्कम स्विकारण्याचे मान्य केले होते.



## शहापूर : खड्ड्यांच्या निषेधार्थ दिव्यांगांचे 'भीक मागो आंदोलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** नागपूर - मुंबई समृद्धी महामार्गाला जोडणाऱ्या शहापुर-सापगाव रस्त्यावरील खड्डयांमुळे नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. रस्ता दुरुस्तीसाठी निधी नाही, असे कारण देणाऱ्या शासनाविरोधात शहापुर-सापगाव संघर्ष समिती आणि एकलव्य दिव्यांग फाउंडेशनच्या दिव्यांग सदस्यांनी गुरुवारी पावसात खड्डेमय रस्त्यावर 'भीक मागो आंदोलन करून तीव्र निषेध व्यक्त केला. या आंदोलनात जमा झालेली रक्कम एमएसआरडीसीला दिला जाणार आहे.

शहापुर - सापगाव रस्त्यावर पडलेल्या खड्यांमुळे रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. वाहन चालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. गेल्या आठ वर्षात उन्हाळ्यात रस्त्यावरील धूळ आणि पावसाळ्यात खड्यांचा चिखल सहन करीत जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याने आम्हाला भीक मागायला लाज वाटत नाही. रस्त्याची दुर्दशा आम्ही पाहू शकत नाही असे म्हणत दिव्यांगांनी गुरुवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास भीक मागो आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधले.

## जिल्हा परिषद आरोग्यवर्धिनी केंद्रातील योग शिक्षक मानधनापासून वंचित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - ठाणे जिल्ह्याच्या पाच तालुक्यांमध्ये ठाणे जिल्हा परिषदेतर्फे आरोग्यवर्धिनी केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांच्या सुदृढ आरोग्याचा विचार करून योग वर्ग चालविले जातात. भिवंडी, मुरबाड, शहापूर, अंबरनाथ, कल्याण तालुक्यांमध्ये स्थानिक पातळीवरील सामाजिक महिला, पुरुष कार्यकर्ते हे योग वर्ग घेतात. या योग शिक्षकांना जिल्हा परिषदेकडून दहमहा मिळणारे सुमारे बारा हजार रूपयांचे मानधन गेल्या चार महिन्यांपासून मिळाले नसल्याने योग शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर आहे. मागील दीड ते दोन वर्षापासून ठाणे जिल्हा परिषदेच्या आरोग्यवर्धिनी केंद्रांच्या माध्यमातून या योग शिक्षकांच्या नियुक्या करण्यात आल्या आहेत. सामाजिक कार्याची आवड असणारे गाव पातळीवरील सामाजिक कार्यकर्ते योग शिक्षक म्हणून गाव, आदिवासी पाड्यांवर जाऊन गावातील रहिवाशांना दररोज सकाळी एकत्र करून योगाचे वर्ग घेतात. यामध्ये गावातील तरूण, ज्येष्ठ, वृध्द, महिला, पुरूष सहभागी होतात. एक तास हा वर्ग दररोज चालतो. दरम्यान, अनुदानाची नस्ती मंजुरीसाठी पाठवली आहे, अशी कारणे योग शिक्षकांना पंचायत समिती कार्यालयातून गेल्या सहा ते सात महिन्यांपासून मिळत आहेत. काम करूनही मानधन मिळत नसल्याने योग शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर आहे.



# ओला दुष्काळ जाहीर करा

### भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समितीची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी (प्रतिनिधी)**

भिवंडी तालुक्यात चालू वर्षी पावसाळ्याचा हंगाम संपला असतांना परतीच्या व अवकाळी पावसाने ऑक्टोंबर महिन्यात जोरदार हजेरी लावल्याने व्यावसायिक व शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.शेतकऱ्यांनी काबाडकष्ट करून भात पिक शेतात तयार केली असतांनाच मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने शेतीतील उभ्या भात पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.त्यामुळे कष्टकरी शेतकरी शेतात कापणी केलेले पीक भिजुन गेल्याने सदरचे हाती आलेले पीक वाया गेले आहे.त्यामुळे कष्टकरी शेतकरी हवालदिल व चिंताग्रस्त झाला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेवून भिवंडी तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने तहसीलदार अभिजित खोले यांना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून करण्यात आली आहे. कृषीउत्पन्न बाजार समितीच्या संचालक श्रीराम पाटील, मनोहर ठाकरे, दीपक पाटील, सचिव प्रवीण गायकवाड यांनी निवेदन देऊन केली आहे.अवकाळी पावसाने शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाल्याने नुकसानग्रस्त शेतीचे तात्काळ पंचनामे करून शासनाकडून त्यांना निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शिष्टमंडळाने केली आहे. त्यामुळे तहसीलदार अभिजित खोले यांनी तातडीने पंचनामे काम सुरू केले असुन संपूर्ण सहकार्य राहिल असे आश्वासन दिले.

# कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रातील २७ गावातील रस्ते पथदिव्यांनी प्रकाशमान !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

सन २०१५ मध्ये २७ गावे ही महापालिका क्षेत्रात समाविष्ठ झाल्यानंतर या २७ गावांमध्ये नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पथदिवे व्यवस्था नव्हती. तसेच काही रस्त्यांवर असलेली पथदिवे व्यवस्था ही सुध्दा तांत्रिक दृष्ट्या सक्षम नव्हती.

महापालिकेने महापालिकेच्या अंदाजपत्रकामधून काही रस्त्यांवर पथदिवे व्यवस्था केली परंतु ती पुरेशी नव्हती. सन २०२३ मध्ये २७ गावामध्ये नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी पथदिवे व्यवस्था करणेकामी २७ कोटी निधीची मागणी महापालिकेने महाराष्ट्र शासनाकडे केली होती. सन २०२४ मध्ये शासनाने १५ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार २७ कोटी निधी मंजूर केला. २७ गावांमधील २०७ रस्त्यांवर ४६७९ पथदिवे पोल व ५२३५ पथदिवे व्यवस्था करणेकामी ऑगस्ट २०२४ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रशासकीय मान्यता मिळाली.

प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर प्रशासनाने तातडीने पुढील प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करुन ऑक्टोबर २०२४ मध्ये कामास सुरुवात केली. महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी महापालिका आयुक्त पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर २७ गावातील पायाभूत सुविधा बाबत विशेष लक्ष देवून तातडीने सर्व कामे हाती घेण्याचे निर्देश सर्व विभाग प्रमुखांना दिले होते. २७ गावातील पथदिवे कामाचा आढावा आयुक्त स्तरावर वेळोवेळी झाल्याने २७ गावातील पथदिवे कामांना सुध्दा गती मिळाली.

त्यामुळे या दिवाळीत २७ गावातील एकूण २०७ रस्त्यांपैकी १४० रस्त्यांवरील एकूण २८०० पथदिवे कार्यान्वित केल्यामुळे या दीपावलीत २७ गावातील रस्ते पथदिव्यांनी उजळल्यामुळे खऱ्या अर्थाने दीपावली साजरी झाली. उर्वरित ६७ रस्त्यांवरील पथदिवे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचा महापालिकेचा मानस असल्याची माहिती विद्युत विभागाचे अतिरिक्त शहर अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली आहे.

# दिपेश म्हात्रे ‘फुटीच्या वाटेवर?’

### कौटुंबिक संबंधांमुळे भाजपच्या दिशेने कल?

- ठाकरे गटाने आखली 'डॅमेज कंट्रोलसाठी' रणनीती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. ३० :** आगामी कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, ठाकरे गटासाठी (शिवसेना उबाठा) डोंबिवलीतून मोठी राजकीय घडामोड घडण्याची शक्यता आहे. ठाणे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे हे पुन्हा एकदा फुटीच्या वाटेवर असल्याची जोरदार चर्चा असल्याने मातोश्रीवरून थेट नव्या जिल्हाप्रमुखांचा शोध सुरू करण्यात आला आहे.

शिंदे गटातून ठाकरे गटात प्रवेश केल्यानंतर म्हात्रे यांनी अल्पावधीतच जिल्हाप्रमुखपद मिळवले आणि गेल्या वर्षभरात मोर्चे, आंदोलने या माध्यमातून लढवय्या भूमिका घेऊन पक्षामध्ये जोश निर्माण केला होता. गेल्या तीन-चार महिन्यांपासून म्हात्रे यांनी कोणतीही विरोधात्मक भूमिका मांडलेली नाही, ज्यामुळे त्यांच्या राजकीय भूमिकेबद्दल तर्कवितर्क लढवले जात आहेत. गणेशोत्सवात भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी म्हात्रे यांच्या घरगुती गणपतीचे दर्शन घेतल्याने राजकीय युद्ध शमल्याच्या चर्चांना उधाण आले. तसेच, त्यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी सलोख्याचे संबंध असूनही, माजी खासदार कपिल पाटील यांच्याशी असलेल्या कौटुंबिक संबंधांमुळे त्यांचा कल भाजपच्या दिशेने अधिक असल्याची चर्चा आहे.

**■ ठाकरे गटाची सावध भूमिका**

म्हात्रे यांच्या वर्तनाबद्दल स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून आलेल्या तक्रारी थेट मातोश्रीपर्यंत पोहोचल्या आहेत. तसेच, त्यांच्या संभाव्य निर्णयामुळे पक्षामध्ये राजकीय गडबड होऊ नये यासाठी 'डॅमेज कंट्रोल' म्हणून पक्षनेतृत्वाने पर्यायी नेतृत्वाचा शोध सुरू केला आहे. ठाकरे गटातर्फे जिल्हा संघटक तात्या माने, महिला जिल्हा संघटक वैजयंती दरेकर, शहरप्रमुख प्रकाश तेलगोटे आणि ग्रामीण प्रमुख राहुल भगत यांच्या नावांची अंतर्गत चर्चा सुरू आहे.

# मुरबाड मतदारसंघाला विकासाचे बळ

### आ. किसन कथोरे यांच्याकडून दहा लाखांच्या विकासकामांचे वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**बदलापूर :** कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने आपला प्रचार वेगात सुरू केला असून, कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी निधीचे बळ देण्याची रणनीती आखण्यात आली आहे. या रणनीतीचा भाग म्हणून आमदार किसन कथोरे यांनी प्रत्येक प्रभागातील कार्यकर्त्यांना "दहा लाख रुपयांच्या दोन विकासकामांचे टॉनिक" देण्याची घोषणा केली आहे. नुकत्याच झालेल्या बदलापूर शहर कार्यकारिणी घोषित करण्याच्या बैठकीत कार्यकर्त्यांना संबोधित



करताना आमदार किसन कथोरे यांनी ही माहिती दिली. लवकरात लवकर त्याचे भूमिपूजन करा, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. नुकत्याच पार पडलेल्या या कार्यक्रमात बोलताना आमदार किसन कथोरे यांनी बदलापूर नगरपरिषदेत यंदा भाजपचाच नगराध्यक्ष विजयी होईल, असा दावा केला. ही निवडणूक आम्ही विकासाच्या मुद्द्यावर लढवणार आहोत. कार्यकर्त्यांच्या मेहनतीशिवाय विजय शक्य नाही, म्हणूनच प्रत्येक प्रभागात दोन विकासकामे देऊन कार्यकर्त्यांना बळ देत आहोत, असेही त्यांनी भाषणात सांगितले. बदलापुरात एकूण २४ प्रभाग आहेत आणि प्रत्येक प्रभागासाठी दहा-दहा लाखांच्या दोन विकासकामांची निवड करा. ही कामे उमेदवारांनी माझ्याकडून पत्राद्वारे मंजूर करून घ्यावीत आणि रविवारपासून प्रत्येक प्रभागात या कामांचा शुभारंभ करावा, असे निर्देश आमदार कथोरे यांनी कार्यकर्त्यांना दिले आहेत. कार्यकर्त्यांचा उत्साह वाढावा म्हणूनच या कामांचा आराखडा आखण्यात आला असल्याचे ते म्हणाले. ही कामे केवळ निवडणुकीसाठी नव्हे, तर कार्यकर्त्यांच्या अंगात ऊर्जा यावी म्हणून देत आहोत. नुकतेच आपण पाच कोटींची कामे दिली होती, आता आणखी सात ते आठ कोटींची कामे देत आहोत. आपल्या कार्यकर्त्यांना टॉनिक मिळावे, म्हणून ही विकासकामे हाती घेत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

“ भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रविंद्रजी चव्हाण यांच्या सूचनेनुसार बदलापूर पूर्व व पश्चिम मंडळ कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून, या कार्यकारिणीतील पदनियुक्ती कार्यक्रम माझ्या बदलापूर येथील कार्यालयात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. या निमित्ताने कार्यकारिणीत काम करण्याची संधी मिळालेल्या सर्व सहकाऱ्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. पक्षाने व्यक्त केलेला विश्वास आपण सर्वजण नक्कीच सार्थ ठरवाल, अशी मला खात्री आहे. कार्यकर्त्यांनी संघटनेचा प्रत्येक ध्येयविचार सक्रियतेने पुढे नेऊन बदलापूरसह संपूर्ण भागात पक्ष संघटना बळकट करावी, असे आवाहन मी यावेळी केले. ■ आ. किसन कथोरे





# पोलादी पुरुष

देशाच्या राजकीय अन् सामाजिक जीवनात *पोलादी पुरुष (आयर्न मॅन)* म्हणून ओळख असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरात राज्याच्या खेडा जिल्ह्यातील करमसद येथे झाला अन् ब्रिटिश राजवटीला तगडं आव्हान देणारा जणू देशात पोलादी पुरुषच उदयास आला.वल्लभभाई यांच्या वडिलांचे नाव झवेरभाई तर,आईचे लाडबाबेन.वयाच्या १८ व्या वर्षी त्यांचा विवाह झवेरबा यांच्याशी झाला.त्यांना डाह्याभाई अन् मनिबेन ही दोन अपत्ये.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या अहिंसा व सत्याग्रह या तत्वांवर देशाला स्वातंत्र्य प्राप्तीसाठी जो लढा उभारला गेला,त्यात वल्लभभाई हे अग्रस्थानी होते.या लढ्या दरम्यान त्यांना गांधीजीसह अनेक वेळा कारावास भोगावा लागला.त्यापूर्वी इंग्लंडमध्ये बॅरिस्टर पदवी संपादन केल्यावर त्यांनी काही काळ वकिली केली.परंतु भारताला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी वकिली सोडून थेट स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली.त्यांचा राष्ट्रीय काँग्रेस पक्षावर मोठा दबदबा होता.त्यांना राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष पद भूषविण्याचा मान मिळाला.

पारतंत्र्याच्या काळात शेतकऱ्यांवर जुलमी कर लादणाऱ्या ब्रिटिश सरकारविरुद्ध स्व.वल्लभभाई पटेल यांनी रणशिंग फुंकले.*मिठाचा सत्याग्रह* केल्याबद्दल इंग्रज पोलिसांकडून अटक झालेले ते प्रमुख नेते होते.महात्मा गांधी यांच्या *छोडो भारत* आंदोलनात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली.इतकेच नव्हे तर,विदेशी मालाची होळी करून सरदार पटेल यांनी खादीचे कपडे व स्वदेशी साहित्य वापरण्याचे भारतीयांना जाहीर आवाहन केल्याने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला.ते महान देशभक्त अन् लढवैये स्वातंत्र्यसेनानी होते. त्यामुळेच त्यांना जनमानसाकडून *पोलादी पुरुष* ही उपाधी मिळाली.

विविध राज्यातील राष्ट्रप्रेमी नेते,देशभक्त सत्याग्रही अन् क्रांतिकारकांच्या समर्पित बलिदानातून अखेर भारताला स्वातंत्र्य मिळाले अन् इंग्रजांची राजवट संपुष्टात आली. स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या केंद्रीय मंत्रिमंडळात सरदार वल्लभभाई पटेल यांची *गृहमंत्री* म्हणून निवड झाली.तसेच त्यांना *उप पंतप्रधान* होण्याचा देखील मान मिळाला. गृहमंत्री असतानाच्या काळात हिंदुस्थानातील ५६५ अर्धस्वायत्त संस्थानांचे देशामध्ये विलिनीकरण करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.त्यामुळे त्यांची प्रतिमा जनमानसात अधिकच उजळली. देशाची एकता,अखंडता व सार्वभौमत्व अबाधित ठेवण्यासाठी त्यांनी आपलं सारं आयुष्य पणाला लावलं.

**पत्रकार रणवीर राजपूत**
**गवर्नमेंट मिडिया, महाराष्ट्र शासन**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील भरीव योगदानाबद्दल कृतज्ञतेच्या भावनेतून त्यांच्या नावाने विविध शैक्षणिक संस्था उभारल्या गेल्या.तसेच सरदार सरोवर ड्याम,सरदार वल्लभभाई पटेल युनिव्हर्सिटी,सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम,सरदार वल्लभभाई पटेल इंटरनॅशनल एअरपोर्ट आणि सर्वात प्रेक्षणीय स्थळ म्हणजे जगातील सर्वात उंच सरदार वल्लभभाई त्यांचा *Statue of Unity of India* हा भव्यदिव्य पुतळा उभारण्यात आला असून,त्याचे अनावरण ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते संपन्न झाले.

महत्वाचे म्हणजे ३१ ऑक्टोबर हा त्यांचा जन्म दिवस *राष्ट्रीय एकता दिन* म्हणूनही साजरा करण्याचा केंद्र सरकारने निर्णय घेतला.याशिवाय त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील नेत्रदीपक कामगिरीसाठी त्यांना *भारतरत्न* हा किताबही बहाल करण्यात आला.देशाप्रती जाज्वल्य राष्ट्रप्रेम अन् निस्सीम देशाभिमान बाळगणाऱ्या पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांना जयंती दिनानिमित्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी आदरांजली वाहून विनम्र अभिवादन केलं.

**जय हिंद! जय महाराष्ट्र!**

# राष्ट्रीय एकता दिवस एकात्म भारताचा संकल्प

**स्वरूप रोहिणी चाया हुले**

प्रत्येक भारतीयासाठी 31 ऑक्टोबर हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण हा दिवस म्हणजे स्वतंत्र भारताचे शिल्पकार, पहिले उपपंतप्रधान तथा गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती. त्यांच्या राष्ट्रव्यापी योगदानाचा सन्मान म्हणून, हा दिवस संपूर्ण देशात 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरा केला जातो. एकता आणि अखंडता हे कोणत्याही राष्ट्राच्या अस्तित्वाचे आणि प्रगतीचे आधारस्तंभ आहेत, हा संदेश या दिनाच्या माध्यमातून आपल्याला मिळतो.

**एकात्मतेचे शिल्पकार: सरदार पटेल**

सरदार वल्लभभाई पटेल यांचे स्वतंत्र भारताच्या निर्मितीतील योगदान अमूल्य आहे. ब्रिटीश राजवटीतून मुक्त झाल्यानंतर, भारत अनेक लहान-मोठ्या 560 हून अधिक संस्थानांमध्ये विखुरलेला होता. या संस्थानांना भारतीय संघराज्यात विलीन करण्याचे अत्यंत गुंतागुंतीचे कार्य त्यांनी आपल्या खांद्यावर घेतले.

या कार्यात, त्यांनी आपल्या कणखर इच्छाशक्ती, राजकीय मुत्सद्देगिरी आणि धैर्य यांचा प्रभावीपणे वापर केला. त्यांनी संस्थानांच्या राजांना विश्वासात घेतले, तर आवश्यक तेथे कठोर भूमिका घेऊन राष्ट्राचे हित सर्वोच्च ठेवले. त्यांच्या याच असीम योगदानामुळे, त्यांना 'भारताचे लोहपुरुष' आणि आधुनिक भारताचे 'बिस्मार्क' म्हणून ओळखले जाते. जर सरदार पटेल नसते, तर आजचा 'अखंड भारत' आपल्याला पाहायला मिळाला नसता.


**राष्ट्रीय एकात्मतेचे आजचे महत्त्व**

सरदार पटेलांनी भौगोलिक एकता साधली, पण आज आपल्याला सामाजिक आणि भावनिक एकात्मतेची गरज आहे. भारत हा विविध भाषा, धर्म, प्रांत आणि संस्कृतींचा देश आहे. ही 'विविधतेतील एकता' हीच आपली खरी ओळख आणि शक्ती आहे. आजच्या काळात, देशांतर्गत मतभेद, सामाजिक सलोखा बिघडवणारे प्रयत्न आणि विघटनकारी शक्तींचे आव्हान उभे आहे. अशा परिस्थितीत, सरदार पटेलांनी दिलेला 'एकता आणि अखंडतेचा महामंत्र' अधिक महत्त्वाचा ठरतो. राष्ट्रीय एकता दिवस आपल्याला शिकवतो की, वैयक्तिक मतभेद किंवा क्षुल्लक गोष्टींपेक्षा देशाचे हित आणि राष्ट्रीय एकात्मता नेहमीच सर्वोच्च असली पाहिजे. 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेची पूर्तता करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय योगदान देणे आवश्यक आहे.

**एकता दिनाचे उपक्रम**

राष्ट्रीय एकता दिवसाच्या निमित्ताने देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या दिवशी, सरदार पटेलांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन, 'राष्ट्रीय एकात्मतेची शपथ' घेतली जाते. तसेच, एकता आणि बंधुत्वाचा संदेश देण्यासाठी 'रन फॉर युनिटी' या दौडचे आयोजन केले जाते, ज्यात लाखो नागरिक उत्साहाने सहभागी होतात. हे सर्व उपक्रम नागरिकांमध्ये राष्ट्रीय अस्मिता आणि देशभक्तीची भावना जागृत ठेवतात.

सरदार वल्लभभाई पटेल यांची 150 वी जयंती हा केवळ एक सोहळा नाही, तर एकात्मतेच्या मूल्यांची उजळणी करण्याची ही एक संधी आहे. त्यांच्या स्मृतिदिनी, आपण सर्व भारतीयांनी, त्यांनी पाहिलेल्या अखंड आणि मजबूत भारताचे स्वप्न साकार करण्याची प्रतिज्ञा करावी. देशाची एकता आणि अखंडता जपण्यासाठी सदैव तत्पर राहणे, हीच 'लोहपुरुष' सरदार वल्लभभाई पटेल यांना खरी आदरांजली ठरेल.



# 'उद्देश असेल तर , ज्यामुळे जगण्याचा आनंद द्विगुणित होईल'

## जेष्ठ नागरीक महोत्सवात आयुक्त अभिनव गोयल यांच प्रतिपादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : जगण्यासाठी एक उद्देश हवा, ज्यामुळे जगण्याचा आनंद द्विगुणित होईल असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी केले. जेष्ठ नागरीक दिनाचे औचित्य साधून 29 ऑक्टोबर रोजी महापालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात आयोजिलेल्या जेष्ठ नागरीक महोत्सवात बोलताना हे प्रतिपादन केले.

अनुभव संपन्न, कार्यकुशल अशा आपणा सर्व जेष्ठ नागरीकांची समाजाला आणि शासनाला देखील गरज आहे,जेष्ठ नागरीक संघांच्या समस्यांचे आपण निश्चितच निराकरण करु असे ते पुढे म्हणाले. महापालिकेच्या प्रत्येक प्रभागात सर्व सुविधायुक्त विरंगुळा केंद्र,जेष्ठ नागरीकांसाठी महापालिकेमार्फत स्थापन केले जाईल. भविष्यकालीन व्हीजन प्लॅनिंगसाठी आपल्या सूचना नक्कीच उपयोगी ठरतील. आपल्या शहराच्या स्वच्छतेसाठी जेष्ठांनी स्वच्छतेचे ब्रॅन्ड ॲम्बॅसिडर म्हणून सहभागी व्हावे, असेही आवाहन आयुक्तांनी या बैठकीत केले. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी आपण सर्व एकत्रितपणे काम करुया, असे म्हणत आयुक्तांनी जेष्ठ नागरीकांना महापालिका सर्वोतोपरी सुविधा पुरवेल, असे आश्वासीत केले.

यावेळी महापालिकेचे अति.शहर अभियंता प्रशांत भागवत, महापालिका सचिव किशोर शेळके, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त रामदास कोकरे, समाज विकास विभागाचे उपायुक्त संजय जाधव, समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर तसेच फेस्कॉमचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे,फेस्कॉम कोकण प्रादेशिक अध्यक्ष विलास काळे, जेष्ठ नागरिक समन्वय समिती डोंबिवलीच्या अध्यक्ष डॉ.वृंदा कौजलगीकर, जेष्ठ नागरिक समन्वय समिती कल्याणचे अध्यक्ष यशवंत कोसुळकर आणि जेष्ठ नागरिक संघाचे इतर पदाधिकारी, सत्कार मुर्ती व्यासपीठावर उपस्थित होत्या.

महापालिकेने शाश्वत शुन्य कचरा मोहीम सुरु केली आहे. त्याचप्रमाणे कचरा वर्गीकरणाचे दिनांक निहाय शेडुलही दिले असल्याने त्याला अनुसरुन सगळ्यांनी सहकार्य करावे, असे उद्गार महापालिका उपआयुक्त रामदार कोकरे यांनी आपल्या भाषणात काढले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी फेसकॉमचे वरिष्ठ पदाधिकारी तसेच कल्याण-डोंबिवलीतील जेष्ठ नागरीक संघाचे पदाधिकारी, जेष्ठ नागरीक यांचा आयुक्त अभिनव गोयल हस्ते स्मृतिचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला. अशा प्रकारे जेष्ठ नागरीकांसाठी, जेष्ठ नागरीक महोत्सव आयोजित करणारी आणि त्याचे समाज माध्यमांवर लाईव्ह प्रक्षेपण करणारी ही कल्याण डोंबिवली ही महाराष्ट्रातली पहिली महानगरपालिका आहे अशा शब्दात फेसकॉमचे अध्यक्ष आण्णासाहेब टेकाळे यांनी महापालिकेची प्रशंसा केली.

या कार्यक्रमात उपस्थित जेष्ठ नागरीकांसाठी मानसोपचार तज्ञ डॉ.अमित धर्माधिकारी यांची अतिशय श्रवणीय अशी मुलाखत डॉ.प्रशांत पाटील यांनी घेतली. डॉ.धर्माधिकारी यांनी जेष्ठ नागरीकांना प्रामुख्याने भेडसावणाऱ्या शारिरीक, कौंटुबिक समस्यांबाबत अतिशय लिलया मार्गदर्शन उपस्थित जेष्ठांना केले. तद्नंतर जेष्ठ नागरिकांनीच सादर केलेल्या हास्य कविता व विडबंन गीतांना जेष्ठ रसिकांनी भरभरुन दाद दिली.

या कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात कल्याण-डोंबिवलीतील जेष्ठ नागरीक संघांमार्फत मार्फत आयोजित करण्यात आलेल्या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमांचा मनोमुराद आनंद उपस्थित जेष्ठांनी लुटला. जेष्ठ नागरीकांना महापालिकेने या कार्यक्रमाच्या माध्यमातून हे एक चांगले व्यासपीठ उपलब्ध करुन दिली असल्याची माहिती समाज विकास विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांनी आपल्या प्रास्ताविकात दिली.

# कल्याण पूर्वेतील रस्ता रुंदीकरण संदर्भात आ. सुलभा गायकवाड यांचा पाहणी दौरा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका अधिकारी मुबंई महानगर प्रादेश विकास प्राधिकरण, आमदार सुलभा गणपत गायकवाड यांनी विविध पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत "यू टाईप रस्ता रुंदीकरण" पाहणी दौरा गुरुवारी करण्यात आला.

या पाहणीदरम्यान आमदार सुलभा गायकवाड यांनी नागरिकांच्या सोयीसाठी आणि वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने रस्ता रुंदीकरणाची अंमलबजावणी अधिक कार्यक्षम आणि नियोजनबद्ध पद्धतीने व्हावी. तसेच या रस्ता रुंदीकरणात विस्थापित होणाऱ्या नागरिकांचे पुनर्वसन प्रधान्याने व्हावे अशी आग्रही भूमिका मांडली.

यावेळी शिवसेना शहरप्रमुख निलेश शिंदे, नगरसेवक अभिमन्यू गायकवाड, नवीन गवळी, रितेश खराटे, मंडळ अध्यक्ष विजय उपाध्याय, अमिताभ सिंग ठाकूर, शहर अभियंता अनिता परदेशी, सहाय्यक संचालक नगररचना गणेश डोईफोडे, नगररचनाकार सचिन घुटे, प्रभाग क्षेत्र अधिकारी सविता हिले, रमेश चव्हाण, जगदीश कोरे तसेच इतर पदाधिकारी, कार्यकर्ते आणि अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# कल्याण पूर्वेत अल्पवयीन तळीरामांचा धिंगाणा



**नागरिकांमध्ये संताप**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्व परिसरात अल्पवयीन मुलांच्या बेधुंद धिंगाण्याचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. काही अल्पवयीन तरुणांनी गाडीवर बसून दारूची बाटली हातात घेत नागरिकांना शिवीगाळ करत दहशत माजवली. या प्रकाराचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत असून, स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हे अल्पवयीन मुलं मोटरसायकलवरून कल्याण पूर्वेतील मुख्य रस्त्यांवरून फिरत होती. त्यांच्या हातात दारूच्या बाटल्या होत्या आणि ते रस्त्याने जाणाऱ्या लोकांना गलिच्छ भाषेत शिवीगाळ करत होते. काहींनी हा संपूर्ण प्रकार मोबाईलमध्ये कैद करून सोशल मीडियावर पोस्ट केला, त्यानंतर हा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या प्रकरणी नागरिकांनी पोलिसांकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. गर्दुल्ले गँग आणि चरसी टोळी नंतर आता या अल्पवयीन तळीरामानी परिसरातील शांतता भंग केली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक रहिवाशांनी संबंधित मोटरसायकल मालक तसेच या अल्पवयीन मुलांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. पोलिसांकडून व्हिडिओच्या आधारे मुलांचा शोध घेतला जात असल्याची माहिती मिळत आहे.

# ठाणे शहरात शनिवारी पाणीबाणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : महापालिका क्षेत्रात नवीन जलवाहिनी कार्यान्वित करण्यासाठी आणि व्हॉल्व्ह बसवण्याच्या तात कामामुळे शनिवारी (ता. १) सकाळी नऊ वाजल्यापासून ते रविवारी (ता. २) सकाळी नऊ वाजेपर्यंत असा २४ तासांचा पाणीपुरवठा बंद (शटडाऊन) ठेवण्यात येणार आहे.

वागळे प्रभाग समिती आणि लोकमान्य सावरकर नगर प्रभाग समितीअंतर्गत येणाऱ्या इंदिरानगर जलकुंभ, श्रीनन जलकुंभ, वारलीपाडा जलकुंभ, कैलासनगर रेनो टँक, रुपादेवी जलकुंभ, रुपादेवी रेनो टँक, रामनगर जलकुंभ, एअर फोर्स जलकुंभ, लोकमान्य जलकुंभ, या विभागांतील पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहील



**शटडाऊनचे कारण**

इंदिरानगर संप येथे पाणीपुरवठा करण्यासाठी नव्याने अंथरण्यात आलेली १,१६८ मि.मी. व्यासाची जलवाहिनी कार्यान्वित करणे.नितीन कंपनी जंक्शन येथे ७५० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीवर व्हॉल्व्ह बसवण्याचे काम करणे.

**पाणीपुरवठा पूर्ववत कधी?**

शटडाऊननंतर पुढील एक ते दोन दिवस पाणीपुरवठा कमी दाबाने होण्याची शक्यता आहे. या पाणीकपातीच्या काळात नागरिकांनी पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.



**आजचे राशि भविष्य**

**मेष**

तुमच्या व्यक्तिमत्वात आणि स्वभावात झालेला बदल उत्कृष्ट असेल. सामाजिक आणि कौटुंबिक सदस्यांकडूनही तुम्हाला विशेष सन्मान मिळेल.

**वृषभ**

देयके गोळा करण्यासाठी आणि आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी ही वेळ चांगली आहे.पाहुण्यांच्या येण्यामुळे घरात आनंदी वातावरण असेल.

**मिथुन**

तुमची वैयक्तिक कामेही आज बऱ्याच प्रमाणात सुरळीतपणे पूर्ण होतील. आज तुमचे आरोग्य चांगले राहील.कोणतीही खास गोष्ट शेअर करू नका.

**कर्क**

तुमच्या जीवनशैलीबद्दल अधिक जागरूक राहणे इतरांच्या आकर्षणाचे केंद्र बनेल. कोणतेही प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस योग्य आहे.

**सिंह**

घरात काही महत्त्वाच्या व्यक्तीच्या आगमनामुळे एखाद्या विषयावर सकारात्मक चर्चा होईल. आज तुमच्या योजना आणि उपक्रम गुप्त ठेवा.

**कन्या**

सर्व मेहनत आणि शक्ती तुमच्या कामात वाहून घ्याल. रागावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. आज जोडीदार आणि कुटुंबातील सदस्यांचे पूर्ण सहकार्य मिळेल.

**तूळ**

कधी कधी अति स्वकेंद्रित असण्याने आणि अहंकाराची भावना असल्यामुळे परस्पर संबंधांमध्ये काही तणाव निर्माण होतो. आरोग्य चांगले राहील.

**वृश्चिक**

कोणतीही योजना राबवण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांचा सल्ला अवश्य घ्या. ध्येय निश्चित करण्यासाठी नवीन योजना कराल, ही योजना भविष्यात प्रभावी ठरेल.

**धनु**

अनुभवी लोकांचे सहकार्य आणि मार्गदर्शन तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल.व्यावसायिक कामकाजात सुधारणा होण्याची अपेक्षा करू नका.

**मकर**

परस्पर संबंध सौहार्दपूर्ण राहतील. सर्व मेहनत आणि शक्ती कामात वाहून घ्याल. आजच्या कार्यात तुमच्या योगदानामुळे तुमचा आदर देखील वाढेल.

**कुंभ**

आईच्या सल्ल्याने विचारपूर्वक घेतलेला कोणताही निर्णय नजीकच्या भविष्यात फायदेशीर ठरेल.तुमच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल होईल.

**मीन**

सकारात्मक राहण्यासाठी, चांगले साहित्यिक आणि कुटुंबातील सदस्यांच्या संपर्कात राहिल्यास चांगले होईल. आज तुमचे लक्ष नवीन कामावर असेल.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in




नियमित वाचा दैं. ठाणे जीवनदीप वार्ता

# दिल्लीत रंगणार सगुण-निर्गुण भक्तीचा संगम

## 'तुका म्हणे, कहे कबीरा' मैफलीतून तुकाराम–कबीरांच्या विचारांचा संगीत संवाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी दिल्ली** : भारतीय अध्यात्मिक आणि सांस्कृतिक जगताला नवी दिशा देणारे दोन महान संत, संत तुकाराम आणि संत कबीर यांच्या विचारांना संगीताच्या माध्यमातून एकत्र आणणारा एक अभूतपूर्व कार्यक्रम राजधानी दिल्लीत सादर होणार आहे. पंचम निशाद संस्थेकडून आयोजित 'तुका म्हणे, कहे कबीरा' ही विशेष संगीत मैफल गुरुवार, 6नोव्हेंबर 2025 रोजी, सायंकाळी 6.00 वाजता, कमानी सभागृह, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली आहे.

**सगुण आणि निर्गुणाचा समन्वय**

सगुण भक्तीचे प्रतीक असलेल्या संत तुकारामांचे अभंग आणि निराकार, निर्गुण तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते संत कबीरांचे दोहे, या दोन भिन्न भक्तीधारांना एकाच मंचावर आणण्याचा हा अनोखा प्रयत्न आहे. प्रसिद्ध गायिका रंजनी-गायत्री तुकारामांची भावपूर्ण अभंगवाणी




सादर करतील, तर गायक भुवनेश कोमकळी कबीरांच्या गहन कबीरवाणीचे सादरीकरण करतील. या दोन महान संतांच्या विचारांमधील मूलभूत एकता आणि 'सत्याचा शाश्वत शोध' या समान उद्देशावर हा कार्यक्रम प्रकाश टाकेल.

**तत्त्वज्ञानाचे सखोल मार्गदर्शन**

या संगीत संवादाला अधिक वैचारिक खोली देण्यासाठी, डॉ. धनश्री लेले हिंदीमध्ये अभ्यासपूर्ण निवेदन व भाष्य करतील, ज्यामुळे श्रोत्यांना दोन्ही संतांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा सहजपणे समजू शकेल. कार्यक्रमात त्यांना मन्दार पुराणिक (तबला), ज्ञानेश्वर सोनावणे (हार्मोनियम) यांच्यासह अन्य कुशल कलाकार साथ देणार आहेत. पंचम निशादचे संस्थापक-संचालक शशी व्यास यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा कार्यक्रम भक्ती आणि संगीताच्या माध्यमातून आत्मिक अनुभूती देणारा ठरेल. 6 नोव्हेंबर 2025 रोजी होणाऱ्या या कार्यक्रमाची तिकीटे www.bookmyshow.com वर उपलब्ध आहेत.

# खारेगाव येथे अवैध गॅस भरण्याचे रॅकेट

## ५० लाखांचा मुद्देमाल जप्त; शिधावाटप विभागाची कारवाई




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** खारेगाव टोलनाका, कळवा परिसरात नियंत्रक शिधावाटप कार्यालयाच्या फिरत्या पथकाने मोठी कारवाई करत अवैध गॅस भरण्याचे रॅकेट उघडकीस आणले आहे. या धाडीत दोन गॅसने भरलेले टँकर आणि व्यावसायिक सिलिंडर जप्त करण्यात आले असून, एकूण ५० लाख एक हजार ५१६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कळवा येथील खारेगाव टोलनाका येथे बुधवारी (ता. २९) पहाटे पावणेपाच वाजता फिरत्या पथकाने अचानक छापा टाकून टँकरमधून व्यावसायिक सिलिंडरमध्ये अवैध गॅस भरण्याचा प्रकार उघडकीस आणला. या वेळी दोन गॅसने भरलेले टँकर, २८ भरलेले व्यावसायिक सिलिंडर, ३० रिकामे व्यावसायिक सिलिंडर जप्त करण्यात आले. याप्रकरणी कळवा पोलिस ठाण्यात टँकरचालक व मालकांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून दोन आरोपींना अटक केली आहे. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई चंद्रकांत डांगे यांनी पदभार स्वीकारल्यानंतरची ही सर्वात मोठी कारवाई ठरली आहे. उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी) गणेश बेल्लाळे यांच्या नेतृत्वाखालील या पथकात अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. या कारवाईमुळे शिधावाटप विभाग 'ॲक्शन मोड' मध्ये आल्याचे दिसून येत आहे.

# विठ्ठलवाडी आगार व्यवस्थापकाचा सीएनजी पंपाजवळ फटाके फोडत वाढदिवस साजरा



## आगारातील प्रवाशांचा जीव धोक्यात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : सार्वजनिक सुरक्षेची काळजी न घेता विठ्ठलवाडी बस आगारात धक्कादायक प्रकार घडल्याचे समोर आले आहे. आगार व्यवस्थापकानेच सीएनजी पंपाशेजारीच फटाके फोडत, स्वतःच्या कारच्या बोनटवर केक कापत वाढदिवस साजरा केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या बेफिकीर प्रकारामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आला असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

या घटना स्थळाजवळच सीएनजी पंप असल्याने कोणत्याही क्षणी मोठा स्फोट होण्याचा धोका निर्माण झाला होता. मात्र, तरीही जबाबदार अधिकाऱ्याने नियम धाब्यावर बसवत फटाके फोडत आनंदोत्सव साजरा केला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित झाल्यानंतर प्रवासी आणि नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

सार्वजनिक स्थळी, विशेषतः सीएनजी पंपाजवळ अशा प्रकारचा उत्सव साजरा करणे अत्यंत धोकादायक असल्याने प्रवाशांनी आणि स्थानिक नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# जीवनसंघर्षकार

## धम्मदीपातून उजळलेलं एक आयुष्य

### डी. एल. कांबळे यांना ७५ व्या वर्षात अभिवादन!



दशरथ लक्ष्मण कांबळे (डी. एल. कांबळे) हे नाव आज बौद्ध साहित्यविश्वात एका तेजस्वी धम्मदीपासारखं झळकतंय. २८ ऑक्टोबर १९५० रोजी भंडारा जिल्ह्यातील मासलमेटा या छोट्याशा गावात जन्मलेले कांबळे सर, आयुष्याच्या पहिल्याच वर्षी पित्याच्या छत्रछायेशिवाय राहिले, पण आईच्या कठोर श्रम, त्याग आणि करुण प्रेमातून उभं राहिलं एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व. गरीबीतही शिक्षणाची ओढ कायम ठेवत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या मिलिंद सायन्स कॉलेज, औरंगाबाद येथून उच्च शिक्षण घेतलं. याच काळात धम्मचळवळीची जाणीव त्यांच्या अंतःकरणात रुजली आणि पुढे त्या जाणिवेचं रूपांतर एका महान धम्मयोध्याच्या प्रवासात झालं. १९७२ मध्ये दूरसंचार खात्यात टेलिफोन ऑपरेटर म्हणून सुरुवात करून, अखेर BSNL कल्याण येथे Assistant General Manager (TP) पदावरून ३१ ऑक्टोबर २०१० रोजी निवृत्त झाले. पण त्यांचा खरा प्रवास धम्माचा प्रचार आणि प्रसार निवृत्तीनंतर अधिक जोमाने सुरू झाला.

धम्मकार्यासाठी आयुष्य समर्पित : १९९६ पासून त्यांनी TBMS येथे धम्ममित्र दीक्षा घेतली. विपश्यना शिबिरांमधून त्यांनी धम्माचे गूढ समजून घेतले. धम्मदीप बुद्धविहारात त्यांनी सुरू केलेल्या धम्मवर्गांमुळे अनेकांनी बुद्ध, धम्म आणि संघ यांची ओळख पुन्हा जिवंत केली.

साहित्यनिर्मितीची असामान्य साधना : २१ मार्च २००४ रोजी "धम्मपद गाथा आणि कथा खंड १" या ग्रंथापासून सुरू झालेला साहित्य प्रवास आज २५ हून अधिक ग्रंथांपर्यंत पोहोचला आहे.

त्यातील काही महत्त्वाचे ग्रंथ : धम्मपद गाथा आणि कथा (खंड १ ते ७) बोधिसत्वाच्या जातक अनुकथा (खंड १ ते ११) तथागतांचा धम्म आणि विज्ञान खरा धम्मधर कोण? बुद्धप्रणीत कम्मसिद्धांत, पुनर्जन्म सिद्धांत, सुगम धम्मपद इत्यादी. या सर्व ग्रंथांतून त्यांनी लोकमानसात तथागतांचा खरा धम्म पोहोचवण्याचं कार्य केले. त्यांच्या लेखनात विचारांची सखोलता, शब्दांची संयमता आणि बुद्धधम्माची वैज्ञानिक मांडणी यांचा अद्भुत संगम दिसतो.

संघटनात्मक आणि साहित्य चळवळ : 'अस्मिता शैक्षणिक धम्मविषयक साहित्यिक चळवळ, उल्हासनगर-४' या संस्थेशी ते सुरुवातीपासून जोडले गेले. ते ५व्या आणि ७व्या बौद्ध साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिले आणि असंख्य धम्मप्रेमींना साहित्यातून जागं करण्याचं काम केलं.

नाट्य, पत्रकारिता आणि प्रसारमाध्यमांतून धम्मसेवा : "ज्योतीची ज्योत" हे ज्योतिराव व सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित संगीत नाटक आचार्य अत्रे रंगमंदिरात हाऊसफुल्ल शो! धम्मसूर्य प्रकाशन या संस्थेतून अनेक ग्रंथ प्रकाशित. धम्मसूर्य चॅनल वर त्यांच्या धम्मविषयक व्याख्यानांचे व महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन विषयक ९० हून अधिक व्हिडिओ उपलब्ध. दैनिक वृत्तरत्न सम्राट, दै. विश्व सम्राट आणि जनतेचा महानायक या वृत्तपत्रांतून त्यांनी लेखन करत धम्मप्रबोधनाचा दीप प्रज्वलित ठेवला.

सन्मान व गौरव : १)त्यांच्या अथक कार्याचा गौरव अनेक संस्थांनी केला — २) भदंत आनंद कौसल्यायन धम्मलेखन महानायक पुरस्कार २०१० ३) कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेचा सन्मानचिन्ह (२०१६-१७) ४) सोशल एज्युकेशन मुव्हमेंटचा 'जीवन गौरव पुरस्कार' (२०२४) ५) मूलभारतीय विचार मंचचा 'Native Hero Award' (२०२५)

आयुष्याचा संदेश : "धम्माचा प्रचार आणि प्रसार करणे हिच खरी मानवसेवा होय." या एकाच ब्रीदवाक्याने प्रेरित होऊन त्यांनी आयुष्यभर समाजजागृती, लेखन आणि प्रबोधन यांचा दीप प्रज्वलित ठेवला. आज जेव्हा डी. एल. कांबळे सर आपले ७५वे वर्ष पूर्ण करत आहेत आणि त्यांच्या 'गौरवग्रंथाचे प्रकाशन' झाले आहे तेव्हा त्यांचं संपूर्ण जीवन हेच एक जिवंत धम्मपद वाटतं! अशा या थोर धम्मदीपाला, साहित्यक्षेत्रातील महानायकाला, आमचं कोटी कोटी नमन! "दीर्घायुषी व्हा सर, तुमच्या लेखणीचा प्रकाश समाजाला नवी दिशा देत राहो!"

**साहित्यिक**
**नवनाथजी रणखांबे**
**लेखक हे आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विविध ऐतिहासिक वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड धारक असून आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय,राज्यस्तरीय विविध पुरस्काराने सन्मानित**

# 'पॉवर अॅण्ड एनर्जी एक्सपर्ट समिती' च्या अध्यक्षपदी डॉ. मुरहरी केळे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रिकल्चर (MACCIA) ही राज्यातील उद्योग, व्यापार व कृषी क्षेत्राची शिखर संस्था असून सन २०२७ मध्ये या संस्थेला शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. भारतातील निवडक वाणिज्य चेंबर्सपैकी एक असलेल्या आणि शतकपुर्तीकडे वाटचाल करत असलेली ही संस्था राज्यातील नवीन उद्योगांना चालना देणे, त्यांना तांत्रिक, कायदेशीर मार्गदर्शन करणे, उद्योजक, व्यापारी आणि शेतकरी यांच्या हक्कासाठी न्याय मागणे यासारखी अनेक कामे करणाऱ्या नामांकित संस्थेच्या 'पॉवर अॅण्ड एनर्जी एक्सपर्ट समिती' च्या अध्यक्षपदी डॉ. मुरहरी केळे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड अॅग्रिकल्चरचे अध्यक्ष श्री. रवींद्र माणगावे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे.

डॉ. मुरहरी केळे यांना उर्जा आणि विद्युत क्षेत्रातील ३५ वर्षापेक्षा जास्त अनुभव असून त्यांनी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, त्रिपुरा राज्यांतील विद्युत मंडळात 'संचालक' तसेच 'अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक' अशा उच्च पदांवर काम केले असून त्यांच्या कार्यकाळात उद्योग आणि कृषी क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. त्यांनी दहा पेक्षा जास्त मराठी आणि इंग्रजी पुस्तके लिहिली असून त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर तसेच अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांनी अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, पत्रकारिता, माहिती तंत्रज्ञान, उर्जा अंकेक्षन आणि मराठी साहित्य या क्षेत्रातील जवळपास १२ पदव्या घेतल्या असून त्यांनी दोन विषयात पीएचडी पदव्या प्राप्त केल्या आहेत. अशा नामांकित व्यक्तीमत्व असलेल्या उच्चविद्याविभूषित आणि उर्जा आणि विद्युत क्षेत्रातील तज्ञ, तसेच वीज क्षेत्रात देशातील पहिले 'पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप मॉडेल' राबवलेल्या डॉ. मुरहरी केळे यांची श्री. रवींद्र माणगावे यांनी संस्थेच्या 'पॉवर अॅण्ड एनर्जी एक्सपर्ट समिती' च्या अध्यक्षपदी नियुक्ती करून अभिनंदन केले आहे. त्यांच्या सहकार्याने उद्योग, व्यापार आणि शेती यांच्या विकासासाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचे काम करणार असल्याचे तसेच त्यांच्या मार्गदर्शनानुसार सदर समितीमधील अन्य सदस्यांच्या समवेत नियमित बैठकांच्या मधून उपक्रमांचे नियोजन व क्रियान्वयन अपेक्षित असल्याची अपेक्षा चेंबरचे अध्यक्ष श्री. रवींद्र माणगावे यांनी व्यक्त केली आहे.

# आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक विजेत्यांचा आयुक्त सौरभ राव यांच्याकडून सन्मान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : बहरीनमध्ये झालेल्या यंदाच्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत हर्डल्स या खेळप्रकारात ठाण्याच्या शौर्या अंबुरे हिने रौप्यपदक प्राप्त केले. तर चौथ्या दक्षिण आशियाई वरिष्ठ अॅथलेटिक्स चॅम्पियनशीप स्पर्धेत हर्ष राऊत याने रिले या खेळप्रकारात रौप्यपदक प्राप्त केले. या दोन्ही खेळाडूंचे सर्वत्र कौतुक होत असून आज ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी ठाणेकरांच्यावतीने या दोन्ही खेळाडूंचा सन्मान केला व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, उपायुक्त मीनल पालांडे,अतिरिक्त पोलीस आयुक्त अविनाश अंबुरे, रुपाली अंबुरे ठाणे




जिल्हा अॅथलेटिक्स असोसिएशनचे सचिव अशोक आहेर, सहसचिव राजेंद्र मयेकर, कोषाध्यक्ष भूपेंद्र ठाणेकर, सदस्य एकनाथ पोवळे, ज्येष्ठ सांख्यिकी तज्ज्ञ रमेश खारकर,प्रशिक्षक अजित कुलकर्णी, निलेश पाटकर तसेच खेळाडूंचे पालक उपस्थित होते.

शौर्या अंबुरे हिने आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी साधताना 100 मीटर हर्डल्स शर्यतीत 13:73 सेकंद अशी वेळ नोंदवत रौप्यपदक मिळवलं. शौर्या ही 16 वर्षीय खेळाडू ठाण्यातील युनिव्हर्सल स्कूल मध्ये शिकत आहे. तर हर्ष राऊत याने १०० मीटर रिलेमध्ये रौप्य पदक जिंकून त्याचे दुसरे आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त केले. हर्ष राऊत हा ठाणे महानगरपालिकेच्या अॅथलेटिक्स असोसिएशनचा खेळाडू आहे.

ठाणे महानगरपालिका ही उत्तमोत्तम खेळाडू घडविण्यासाठी विविध प्रशिक्षण योजना राबवित आहे. तसेच खेळाडूंना आवश्यक असलेल्या सोईसुविधा ही महापालिकेच्या माध्यमातून देत असून असून महापालिका कायमच खेळाडूंच्या पाठीशी असल्याचे सांगत आयुक्त सौरभ राव यांनी या दोन्ही खेळाडूंना त्यांच्या भावी कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांच्याकडून नियमित सराव करुन घेणारे त्यांचे प्रशिक्षक अजित कुलकर्णी, निलेश पाटकर यांच्या देखील आयुक्तांनी सन्मान केला असून या मुलांना प्रोत्साहन देणाऱ्या त्यांच्या पालकांचेही कौतुक केले.

# वरप गावात दिवसाढवळ्या दरोडा



## पोलिसांसमोर चोरांचे आव्हान ?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण तालुक्यातील नामांकित जेष्ठ पत्रकार, तथा समाजसेवक संजय कांबळे यांचे मोठे बंधू श्रीकांत जयवंत कांबळे यांच्या वरप ता कल्याण येथील इमारतीच्या तिसऱ्या माळयावरील घरी दिवसा१तेरच्या दरम्यान धाडसी दरोडा पडला ,विशेष म्हणजे या चोरांना काही मुलांनी पाहिले तरी देखील ते अंत्यत शांत पणे चोरी करून बिनधास्तपणे पसार झाले, ऐवढयावरच न थांबता त्यांच्या शेजारील घर देखील फोडले, असा हा प्रकार पहिल्यांदाच होत असून हे कल्याण तालुका पोलिसांन समोर मोठे आव्हान उभे केले आहे. यामुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे तसेच पोलिसांच्या कार्यकुशलते वर प्रश्न निर्माण करणारे ठरत आहे. वरप दुर्गानगर येथील डॉ अक्षय पॅलेस इमारतीच्या तिसऱ्या माळयावर राहणारे श्रीकांत जयवंत कांबळे हे पत्रकार संजय कांबळे यांचे मोठे बंधू आहेत, तेही याच इमारतीच्या पहिल्या माळयावर राहतात. दिपावली सुट्टी निमित्ताने ते गावे गेल्याचे पाहून चोरट्यांनी त्यांच्या घराचा दरवाजा, कपाट फोडून कपाटातील सोने पसार केले. ऐवढीवरच न थांबता त्यांच्या शेजारी राहणाऱ्या कै सुरेश रामचंद्र चौधरी यांचे घर देखील फोडले. हे सर्व दिवसा१ते २च्या दरम्यान घडले. अजूनही आश्चर्य म्हणजे या दोन्ही घराच्या मध्ये दिनेश आहिरे यांचा प्लॅट आहे,ते घरात होते, त्यांनीच हा प्रकार पत्रकार संजय कांबळे यांना सांगितला, इमारतीच्या आवारात खेळणाऱ्या काही मुलांनी या चोरांना पाहिले देखील!त्यांच्या सांगण्यानुसार हे ३जण होते, एका ने बॅग अडकवली होती, टोपी घातली होती व तोंड बांधले होते, या इमारतीला गेट, सीसीटीव्ही, आणि वॉचमन नसल्याचा फायदा चोरट्यांनी घेतला आहे. या शिवाय म्हारळ, वरप, कांबा यासह संपूर्ण तालुक्यात, चोरी, दरोडे, हाणामारी, मारामारी, बलात्कार, विनयभंग, हत्या, छेडछाड असे प्रकार वाढले आहेत, त्यामुळे नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक श्री गिरी हे कसे कंट्रोल करतात याकडे लक्ष लागले आहे, या एकूणच प्रकाराबद्दल चोरट्यांनी मात्र पोलिसांन समोर आव्हान उभे केले असून या बाबतीत आपण वरीष्ठ पोलीस अधिकारी तसेच पोलीस अधीक्षक डॉ स्वामी यांची भेट घेऊन चर्चा करणार असल्याचे पत्रकार श्री कांबळे यांनी सांगितले.




## पायाभुत सुविधांच्या अनुदानासाठी शाळांनी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**रायगड :** अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून अल्पसंख्याक बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत पात्र संस्थांना रु.10 लाखांपर्यंत अनुदान देण्यात येईल. जिल्ह्यातील इच्छुक शाळांनी सन 2025-26 या आर्थिक वर्षाकरीता विहीत नमुन्यातील अर्जासह परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांच्याकडे दि.14 नोव्हेंबर 2025 पर्यंत सादर करावेत असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, उच्चस्तरीय निवड समिती, रायगड-अलिबाग उमेश सुर्यवंशी यांनी केले आहे. सदर तारखेनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.



## पेण येथे नवनियुक्त शिक्षकांचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** नवनियुक्त शिक्षक प्रशिक्षण पेण एज्युकेशन सोसायटीच्या सौ.म. ना. नेने कन्या विदयालय पेण येथे २५ ऑक्टोबर ते ३१ऑक्टोबर पर्यंत सुरु आहे. जिल्हा स्तरीय प्रशिक्षणासाठी ८८ शिक्षक शिक्षिका प्रशिक्षणार्थी उपस्थित आहेत.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल पंचायत समिती पेण यांच्या मार्फत पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणअधिकारी शर्मिला शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असून तज्ञ मार्गदर्शक म्हणून संजय पाटील(पनवेल) जितेंद्र म्हात्रे(पेण) करुणा म्हात्रे विषयतज्ञ(पेण) म्हणून उत्तम प्रकारे करत असून शिक्षकांना येणाऱ्या प्रत्येक अडचणीचे मार्गदर्शन करून भविष्यात अध्यापन कसे करावे विद्यार्थ्यांचे मनोरंजन करून त्यांचा पाया भक्कम कसा करावा याबरोबर अध्ययन अध्यपन विविध शालेय योजना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP SQAAP निपुण आदि विविध विषयांवर सविस्तर माहिती दिली जाते.या प्रशिक्षणाचे नियोजन व व्यवस्थापन विषयतज्ञ पंचायत समिती पेण निलेश मानकवले पुरुषोत्तम म्हात्रे हे करत आहेत.

## वाडा तहसील कार्यालयासमोर तरुणांचे आमरण उपोषण



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाडा :** विविध मागण्यांसाठी वाडा तालुक्यातील आमगाव ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या एका इंजिनिअरिंग कंपनीत व्यवस्थापनाच्या मुजोरीने स्थानिक तरुणांना रोजगार नाकारण्यात आला आहे. ग्रामपंचायतीने नाहरकत दाखले देताना स्थानिकांना रोजगार द्यावा असे आश्वासन घेऊनही कंपनी स्थानिक मराठी तरुणांना रोजगार देत नसल्याने तरुण संतप्त झाले आहेत. याशिवाय महावितरणने पथदिवे काढून कारवाई केल्या विरोधात आणि ग्रामपंचायत भ्रष्टाचाराच्या विरोधात चुकीचा अहवाल पाठविणे, चांगले रस्ते दुरुस्तीच्या नावाने उखडून काढणे अशा अनेक समस्यांचा जाब विचारण्यासाठी तरुणांचे तहसीलदार कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू आहे. आमगाव हद्दीत असणाऱ्या इंजिनिअरिंग कारखान्यात व्यवस्थापक अतिशय मुजोरी करीत असून जवळपास ४० ते ५० तरुणांनी रोजगाराची मागणी करूनही कुणाला काम मिळत नसल्याने तरुण संतापले आहेत. स्थानिक व मराठी असल्याचा राग मनात धरून व्यवस्थापन रोजगार देत नसल्याचे तरुणांचे म्हणणे असून स्थानिकांवर होणारा हा अन्याय दुर्दैवी आहे असे त्यांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायतीत भ्रष्टाचार झाला असून त्याचे पुरावे देऊनही अधिकाऱ्यांनी वरिष्ठांना चुकीचा अहवाल पाठविल्याचे निवेदनात म्हटले आहे. ग्रामपंचायत हद्दीतील काही रस्ते मंजूर असल्याची बतावणी करून खोदकाम करण्यात आले. प्रत्यक्षात रस्ते मंजूर नसून खोदकाम का करण्यात आले असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. ग्रामपंचायत हद्दीत लाखों रुपयांचा खर्च करून बसविण्यात आलेले पथदिवे महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी काढून नेले असून याविरोधात नियमांची पायमल्ली झाल्याचा आरोप करून महावितरण अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामपंचायत हद्दीतील काही तरुण याविरोधात मंगळवारपासून आमरण उपोषण करीत असून ठोस कारवाई होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही असा इशारा देण्यात आला आहे.

# किर्तनातून मानसिक आरोग्य आणि अध्यात्मातून आनंदाकडे

किर्तन हा प्रकार सर्वश्रुत आहे. महाराष्ट्रात वारकरी आणि नारदिय किर्तन जास्त लोकप्रिय आहेत.राष्ट्रीय असो, की लोकप्रिय, स्थानिक पुरुष किर्तनकार असोत की महिला किर्तनकार असोत, लोक वारकरी किर्तनच पसंत करतात. किर्तनाचा मूळ हेतू असतो. तो भक्ती किर्तनात पूर्वरंग आणि उत्तररंग असे दोन प्रकार आहेत. यात पूर्वरंगात एक अभंग घेऊन त्यावर विवेचन केले जाते. यात गायनासाठी ताल, संगीत, पोवाडे, दिंडी, टाळ, पखवाज, वीणा आदीच्या आधारे किर्तनकार महाराज अभंग गातात. किर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करतात.. गेली कित्येक वर्ष वडिलोपार्जित किर्तन परंपरेच ज्ञान लाभलेले ह.भ.प कल्पेश महाराज शिंदे यांनी आध्यात्मिक उपक्रम म्हणून ठेवलेला आहे. शिक्षक, समुपदेशाकीय शिक्षण घेऊन नोकरी सांभाळून किर्तन, प्रवचन, सेवा स्वानंदसुखनिवासी गुरुवर्य गोविंदबाबा यांचे शिष्य




वैकुंठवासी ह.भ.प. केरूबाबा शिंदे निष्ठावंत वारकरी म्हणून परिचित होते यांचे ते नातू असून त्यांच्या कृपाछत्राने सुरु ठेवली आहे.

घरी आध्यात्मिक वातावरण सहजच लाभले या वातावरणामुळे किर्तनातील मुख्य भागांचा परिचय झाला होता. पण किर्तनकार होईन असे वाटले नव्हते. सुदैवाने त्यांना ती त्यांचे मार्गदर्शक ह भ प महेशभाऊ बांगर सारशी आणि निलेशदादा पाटील सोनशिव यांच्यामुळे संधी मिळाली. आणि अश्या प्रकारे ते घडले. समाज प्रबोधन करता करता अध्यात्मिक ज्ञान व मानसिक आरोग्य किती महत्वाचे आहे. समाजप्रबोधनाचा भाग म्हणून युवकांना संदेश देत ते किर्तन प्रवचन करू लागले. कॉर्पोरेट विश्वात ते अगोदरच सेवा देत होते. व हे व्यवस्थित ज्ञान घेऊनच अध्यात्माचा प्रचार आणि प्रसार ते आपल्या निरूपणात करतात. कॉर्पोरेट जगतातच नव्हेतर सर्वत्र किर्तनाच्या माध्यमातून उपदेशाची गरज आहे. मानव आत्मकेंद्रित तर झालाच आहे. शिवाय पैशांच्यामागे लागून शारीरिक व मानसिक आरोग्य गमावून बसला आहे. त्यावर उत्तम पर्याय म्हणजे कीर्तनातुन समाजप्रबोधन... कार्य जरी कठीण असले तरी अशक्य असं काहीच नाही. याची जाणीव श्री कल्पेश महाराज शिंदे यांना पुरेपूर आहे. मानसिक आरोग्य मजबूत होण्यासाठी आध्यात्मिक ज्ञान खूप महत्वाचं आहे. सध्या ते युवा किर्तनकार, प्रवचनकार, समाजप्रबोधनकार, शिक्षक, समुपदेशक, अध्यापक, मार्गदर्शक, दिशादर्शक, व्याख्याते, वक्ता, निवेदक सूत्रसंचालक आदी विविधलिलया पार पाडत आहेत. स्वानंदसुखनिवासी गुरुवर्य गोविंदबाबा यांचे शिष्य असलेले कल्पेश महाराज शिंदे हे नेहमीच आशावादी दृष्टीकोन ठेवायला सांगतात. समाजप्रबोधनाचा वारसा पुढे चालवताना गेली 10 वर्षे मानसिक आरोग्य, मनशक्ती, जो मन जिंकेल तोच जग जिंकेल आदी विषयांवर समाजप्रबोधन करत आहेत. त्यांनी आता सर्वांपर्यंत पोहोचणारे माध्यम घेऊन आरोग्य व अध्यात्म यांची योग्य सांगड घातलेले किर्तन, प्रवचन नक्कीच दिलासा देणारे ठरू शकते असे ह.भ.प कल्पेश महाराज शिंदे यांचे म्हणणे आहे.

### मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत
## ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण घरकुल कामांचा पहाणी दौरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** मा.मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार राज्यामध्ये मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये घरकुलांना उद्दिष्टाप्रमाणे मंजुरी देणे, मंजुर घरकुलांना कामाचे टप्पयानुसार हप्ता वितरीत करणे, वाळू / रेती पासचे वितरण तसेच सर्व घरकुले भौतिकदृष्टया पूर्ण करणे व टप्पा 2 मधील मंजूर घरकुलांना प्रधानमंत्री सुर्यघर योजना लाभाची अंमलबजावणी हे उपक्रम समाविष्ट आहेत.



त्याअनुषंगाने जिल्हयातील केंद्रपुरस्कृत व राज्यपुरस्कृत योजनेंतर्गत मुरबाड तालुक्यातील पाटगाव, शिरगाव शहापूर तालुक्यातील खातीवली, बोरशेती, खर्डी व भिवंडी तालुक्यातील काटई, कांबे, पारिवली येथील मंजूर ग्रामीण घरकुलांच्या कामांची दि. 29 ऑक्टोबर 2025 रोजी पाहणी केली. ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य संचालक डॉ.राजाराम दिघे, अपर आयुक्त (विकास), कोकण विभाग माणिक दिवे यांचे समवेत प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, तसेच उपसंचालक डॉ. सचिन पानझडे व राजलक्ष्मी येरपुडे यांनी ठाणे जिल्हयातील शहापूर, मुरबाड व भिवंडी तालुक्यातील घरकुलांचे कामांची पहाणी केली तसेच पहाणी दौरा दरम्यान लाभार्थ्यांशी संवाद साधून मनरेगाच्या कामाबाबतही लाभार्थ्यांशी चर्चा केली.

या पहाणी दौऱ्यानंतर शहापूर पंचायत समितीमध्ये सर्व गट विकास अधिकारी, सहा.गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी (सांख्यिकी), सहा. कार्यक्रम अधिकारी, मनरेगा, सहा.लेखा अधिकारी, डाटा ऑपरेटर घरकुल/नरेगा व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचा मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण संबंधीत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला.

यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्प्या-1 व टप्पा-2 आणि राज्य पुरस्कृत योजनेतील अपूर्ण घरकुले अभियान कालावधीत पूर्ण करणे. सर्व मंजूर घरकुल लाभार्थ्यांना मनरेगा अंतर्गत लाभ देणे. तसेच प्रधानमंत्री सुर्यघर योजना / अन्य योजनेतून टप्पा 2 मधील मंजूर सर्व घरकुलांना सौर ऊर्जा प्रकल्प बसवणे, तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे याविषयांचा आढावा घेण्यात आला व कामे जलदगतीने पूर्ण करणेसाठी मार्गदर्शन डॉ.राजाराम दिघे, संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य व श्री.माणिक दिवे, अपर आयुक्त, कोकण विभाग यांनी केले.

या अभियान कालावधीत उपक्रम पूर्ण करणेचे निर्देश जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांनी सर्व गट विकास अधिकारी यांना दिले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाला शुभारंभ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातर्फे “सशस्त्र सेना ध्वजदिन 2025 निधी संकलन शुभारंभ” कार्यक्रम मंगळवार दि.09 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 12.00 वाजता जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या राष्ट्रीय कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील इतर मान्यवर सुद्धा उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचा शुभारंभ उपस्थितांना ध्वज लावून व ध्वजदिन निधी स्विकारून करण्याचे निश्चित झाले आहे.

या राष्ट्रीय कार्यक्रमास मंगळवार, दि.09 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 11.45 वाजता उपस्थित राहावे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ठाणे/पालघर मेजर प्रांजल जाधव (निवृत्त) यांनी कळविले आहे.

# योगीता जाधव यांचा "ग्रामरत्न सरपंच" पुरस्काराने गौरव

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा :** भिवंडी तालुक्यातील दुर्गम भागातील चार गावे व १८ गांव पाड्यामंध्ये विस्तार असलेल्या राहूर गृप ग्रामपंचायतीच्या सरपंच योगीता जाधव यांना त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल राज्यस्तरीय "ग्रामरत्न सरपंच" पुरस्कार देऊन गौरविण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.




पंचायत राज विकास मंच संचालित आखील भारतीय सरपंच परीषदेच्या वतीने पुणे जिल्ह्यातील लोणावळा येथे हा पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम नुकताच घेण्यात आला यावेळी भिवंडी तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या राहुर गृप ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या राहुर, देवळी, कुंभारशिव, सांवरोली या महसुली गांवासोबत १८ गांव, पाड्यात रस्ते, विज, पिण्याचे पाणी, शिक्षण, आरोग्य, वैयक्तिक लाभाच्या योजना राबवून, विवीध योजनांची नागरीकांना विस्तृत माहीती देणे त्याचा पाठ पुरावा करणे, असे अभिनव, नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले तसेच योग्य नियोजन करून विकासकामांबरोबर विवीध उपक्रम, योजना, कार्यक्रम राबवून ग्रामपंचायत हद्दीतील नागरीकांचे विविध महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावले आहेत. त्यांच्या या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन सरपंच योगीता योगेश जाधव यांना राज्यस्तरीय "ग्रामरत्न सरपंच" पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी आखील भारतीय सरपंच परीषदेचे अध्यक्ष जयंत सर्जेराव पाटील, "यशदा" चे संचालक मल्लिनाथ कलशेट्टी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे माजी प्रमुख मंगेश चिवटे समाजसेवक योगेश जाधव व आखील भारतीय सरपंच परीषदेचे पदाधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

## मुरबाड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापतीपदी अशोक भगत यांची निवड

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** मुरबाड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रिक्त असलेल्या उपसभापती पदी अशोक भगत यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

माजी आमदार गोटिराम पवार यांचे खंदे समर्थक म्हणून अशोक भगत व त्यांचे कुटुंब राजकारण व समाजकारणात गेले अनेक वर्ष काम करत आहेत. गोटिराम पवार



यांनी त्यांच्यावर विश्वास दाखवत त्यांची ही निवड करण्यात आली आहे.शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी मी प्राधान्य देणार असल्याचे अशोक भगत यांनी सांगितले.

या निवडी नंतर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष पवार, बाजार समितीचे चेअरमन दिपक खाटेघरे, माजी चेअरमन बाळकृष्ण चौधरी,लक्ष्मण सरनिंगे, धनाजी दळवी,मोहन भावार्थे एड.अशोक फनाडे,सुनिल घागस,लक्ष्मण भगत, भगवान भगत व त्यांचे कुटूंबिय उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## प्रायव्हेट हायस्कूल पेण येथे निवडश्रेणी व वरिष्ठवेतन श्रेणी प्रशिक्षण



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल आणि जिल्हा परिषद रायगड यांच्या आयोजना नुसार २५ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत १० दिवसचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण प्रायव्हेट हायस्कूल पेण येथे सुरू आहे. निवडश्रेणी साठी ३० तर वरिष्ठवेतन श्रेणी साठी १७ शिक्षक प्रशिक्षण घेत आहेत

सदर प्रशिक्षणात निवड श्रेणी प्रशिक्षणासाठी सुलभक म्हणून राकेश अहिरे (शाळा संतोषी वाडी पेण)राजेंद्र पाटील(शाळा अंतोरे) सोनल गावंड (शाळा नानोशी पनवेल)अंजली जोशी मुख्याध्यापिका कन्या शाळा पेण हे उत्तम प्रकारे काम करीतआहेत. तर वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षणात नरेश पाटील( विषय तज्ञ खालापूर) सुनिल सातूनकर(शाळा माजगाव) उस्मान शेख (शाळा कांढरोली) रुपाली पाटील(शाळा मोहोपाडा) हे तज्ञ मार्गदर्शक म्हणून उत्तम प्रकारे काम करीतआहेत. या प्रशिक्षणात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०,बालका संदर्भात कायदे, शाळा गुणवत्ता व मूल्यांकन आराखडा ,अध्यापन शास्त्र व मूल्यमापन, माहीती तंत्रज्ञान, शालेय संशोधन, नवोपक्रम, २१ व्या शतकातील कौशल्य या विषयावर मार्गदर्शन केले जात आहे. या प्रशिक्षणास पेण पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे मॅडम यांनी भेट देऊन उत्तम प्रकारे माहिती दिली व शिक्षक बांधवांना मोलाचे मार्गदर्शन केले.प्रशिक्षण समन्वयक म्हणून निलेश मानकवळे व पुरुषोत्तम म्हात्रे विषयतज्ञ पेण हे काम पहात आहेत.

### सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त
## “रन फॉर युनिटी” कार्यक्रमाचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** सरदार वल्लभभाई पटेल यांची 150 वी जयंती दि.31 ऑक्टोबर 2025 रोजी साजरी करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने दि.31 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 06:30 वाजता “रन फॉर युनिटी” हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून हा कार्यक्रम छत्रपती शिवाजी महाराज मैदान, तलावपाळी, ठाणे येथून सुरू करण्यात येवून पुन्हा त्याच ठिकाणी समाप्त करण्यात येणार आहे. “रन फॉर युनिटी” कार्यक्रम ठाणे पोलीस आयुक्तालय व ठाणे शहरातील नागरिकांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात येणार असल्याने या कार्यक्रमामध्ये ठाणे शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाने केले आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024